शिधावाटप/रास्तभाव दुकानांच्या परवाना व तद्नुषंगिक इतर दस्तावेजांच्या शुल्कामध्ये आणि अनामत रकमेमध्ये सुधारणा करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-४०२६/प्र.क्र.२०३/नापु-३१

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ०९ ऑक्टोबर,२०२६

**वाचा-**

१) शासन निर्णय क्रमांकः साविव्य-१०९७/प्र.क्र.८०३८/नापु-२८, दि. २०.१२.१९९७.

२) शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-१८०२/२६९२/प्र.क्र.७२३/नापु-२८, दि. २.२.२००२.

३) शासन निर्णय क्रमांकः साविव्य-१००५/प्र.क्र.२०७५/नापु-२८, दि. ३.११.२००७.

४) शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०२१/प्र.क्र.०६/नापु-३१, दि. ०७.०६.२०२१.

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाच्या 'ईझ ऑफ डुईंग बिझनेस' (Ease of Doing Business) अंतर्गत राज्यस्तरीय सुधारणांमध्ये रास्तभाव दुकानांना मंजुरी व तद्नुषंगिक बाबी ऑनलाईन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही शासनाकडून सुरू आहे. या ऑनलाईन प्रक्रियेसाठी येणाऱ्या प्रशासकीय खर्चाचा विचार करून संदर्भाधीन दि. ०७ जून २०२१ च्या शासन निर्णयान्वये रास्तभाव दुकानांचे परवाना शुल्क, अनामत रक्कम, नूतनीकरण शुल्क इत्यादींमध्ये सुधारणा करण्यात आली होती.

२. सध्याच्या तरतुदीनुसार मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र, इतर महानगरपालिका क्षेत्र आणि इतर नागरी क्षेत्र या वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी अधिकृत दुकानदारांची अनामत रक्कम वेगवेगळी आहे. प्रशासकीय सुलभतेसाठी आणि धोरणात्मक सुसूत्रीकरण आणण्यासाठी या सर्व क्षेत्रांतील (मुंबई-ठाणे, इतर मनपा व इतर नागरी क्षेत्र) अधिकृत दुकानदारांसाठी समान **₹ ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र)** इतकी अनामत रक्कम निर्धारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

प्रस्तावनेत विशद केलेली पार्श्वभूमी तसेच प्रशासकीय कामकाजाच्या सुलभतेसाठी आणि धोरणामध्ये सुसूत्रीकरण आणण्याच्या उद्देशाने, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र, इतर महानगरपालिका क्षेत्र आणि इतर नागरी क्षेत्रांसाठी निर्धारित अनामत रकमेत शासनाकडून एकसमान सुधारणा करण्यात येत आहे. त्यानुसार, सुधारित तक्ता खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे::-

| अ. क्र. | तपशील | सध्याचे शुल्क / अनामत रक्कम / विलंब आकार / दंड रक्कम | सुधारित शुल्क / अनामत रक्कम / विलंब आकार / दंड रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | अधिकृत शिधावाटप / रास्तभाव दुकानाच्या व त्याच्या संघटीत संस्थेच्या प्राधिकार पत्र मंजूरीकरीता / नुतनीकरण करिता आवेदन अर्ज शुल्क | ₹ ५/- | ₹ ५०/- |
| २. | अधिकृत शिधावाटप / रास्तभाव दुकानाच्या व त्यांच्या संघटीत संस्थेच्या प्राधिकारपत्र परवाना शुल्क | ₹ १००/- | ₹ ५००/- |
| ३. | परवान्याचे/ प्राधिकारपत्राचे नुतनीकरण शुल्क | ₹ २०/- (प्रति वर्ष) | ₹ १००/- (प्रति वर्ष) |
| ४. | दुय्यम (डुप्लीकेट) प्राधिकारपत्र / परवाना शुल्क | ₹ ५०/- | ₹ ५००/- |
| ५. | **१.मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र<br>२.इतर महानगरपालिका क्षेत्र<br>३. इतर नागरी क्षेत्रातील सर्व अधिकृत दुकानदार- अनामत रक्कम** | **₹ ५०००/-<br>₹ ३०००/-<br>₹ २०००/-** | **₹ ५०००/-** |
| ६. | ग्रामीण क्षेत्रातील सर्व अधिकृत दुकानदार- अनामत रक्कम | ₹ १०००/- | ₹ २०००/- |
| ७. | रास्तभाव दुकानदार / अधिकृत शिधावाटप दुकानदार प्राधिकारपत्र नुतनीकरण विलंब शुल्क | ₹ १/-(प्रति दिन) | ₹ ५०/-(प्रति दिन) |
| ८. | स्वयंसहायता बचत गटाला रास्तभाव / अधिकृत शिधावाटप दुकाने/किरकोळ केरोसीन परवाना अनामत रक्कम. | ₹ २५००/- | ₹ ५०००/- |

२. उपरोक्त नमूद शिधावाटप/रास्तभाव दुकानांचे परवाना शुल्क व इतर शुल्कांचे सुधारित दर हे RCMS (https://rcms.mahafood.gov.in) या पोर्टलवर सदर सेवा ऑनलाईन स्वरूपात

कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि, सदर ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत, विहित शुल्क प्रचलित ऑफलाईन कार्यपद्धतीनुसार व विद्यमान (जुन्या) दरानेच स्वीकारण्यात येतील. तसेच, ज्या दुकानदारांनी यापूर्वीच अनामत रक्कम जमा केली आहे, त्यांना नव्याने लागू करण्यात आलेली सुधारित अनामत रक्कम पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१००९१६४४०७४५०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NITIN GANESH SONKHASKAR

Digitally signed by NITIN GANESH SONKHASKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT,
2.5.4.20=ad84daad5bc79f6d90c62a987708b24ed191867c04fb6c815de59aff3e614298, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=29F6A57CDB1152EAB3B6F60FA7218F9DA9621B43A1094379E9D6D5E49321B789, cn=NITIN GANESH SONKHASKAR
Date: 2026.10.09 16:44:55 +05'30'

**(नितीन गणेश सोनखासकर)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
४. मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद.
६. मा.राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
७. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव.
९. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई ३२.
१०.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी.
११.सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१२.महासंचालक, यशवंतराव चव्हाण प्रशासन प्रबोधिनी, बाणेर रोड, पुणे.
१३.सर्व विभागीय आयुक्त.
१४.वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, मुंबई.
१५.सर्व जिल्हाधिकारी.
१६.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
१७.नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.

१८. सर्व उपायुक्त (पुरवठा).

१९.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.

२०.सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.

२१.महालेखापाल (लेखा/अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई.

२२.महालेखापाल (लेखा/अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२ नागपूर.

२३.महालेखापाल लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

२४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

२५.महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

२६.वित्त विभाग (व्यय-४), मंत्रालय, मुंबई ३२.

२७.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

२८. माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

२९.अध्यक्ष, ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकिपर्स फेडरेशन, पुणे.

३०.अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ, पुणे.

३१.अध्यक्ष, मुंबई रेशन दुकानदार संघटना, मुंबई

३२.निवड नस्ती (कार्यासन नापु. ३१) (५ प्रती).